# ज. ए. इ. ची प्राथमिक शाळा
# सुभेदार वाडा, कल्याण.

## * अहवाल सन २०१५ - २०१६. *

जनरल एज्युकेशन इन्स्टिट्यूटची प्राथमिक शाळा, सुभेदार वाडा, गांधी चौक कल्याण आपला वार्षिक अहवाल सादर करीत आहे.

* जून १९८५ साली जनरल एज्युकेशन इन्स्टिट्यूटची प्राथमिक शाळा, सुभेदार वाडा, कल्याण (प.) येथे सुरू झाली. सध्या शाळेच्या प्राथमिक विभागात १६ वर्ग असून ८८२ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. शाळेत १ मुख्याध्यापिका, १६ शिक्षक, १ लेखनिक व १ सेविका कार्यरत आहे. संस्था पातळीवर १ संगीत शिक्षिका, २ जादा शिक्षक, १ लेखनिक व ५ सेविका कार्यरत आहे. त्यामुळे शाळेचे नियोजन व्यवस्थित होते.

* सन २०१५-१६ चे शैक्षणिक वर्ष १५ जून २०१५ पासून सुरू झाले. इ. १ ली ते ४ थी च्या सर्व विद्यार्थ्यांना सर्व शिक्षा अभियानांतर्गत मोफत पाठ्यपुस्तके वाटप करण्यात आली.

* आपल्या शाळेत गेल्या ५ वर्षापासून इ. १ ली ते ४ थी च्या विद्यार्थ्यांना संगणकाचे शिक्षण दिले जाते. इ. १ ली, २ री, ३ री चे प्रत्येकी ३ वर्ग व इ. ४ थी चे २ वर्ग सेमी इंग्रजीचे घेण्यात येत आहेत. तसेच इ. १ ली, २ री, ३ री चा प्रत्येकी एक वर्ग मराठी माध्यमाचा व इ. ४ ची चे २ वर्ग मराठी माध्यमाचे आहेत.

* पूर्व माध्यमिक शिष्यवृत्तीच्या परीक्षेचा निकाल ९५% लागला. आपल्या ७ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळाली. गुणवत्ता यादीत झळकलेल्या विद्यार्थ्यांची नावे (व जिल्ह्यातील क्रमांक) कंसात पुढीलप्रमाणे -
कु. श्रेया चंद्रशेखर दुधारकर (८ वी, गुण-२४८), कु. कुशल अजय नेवे (२० वा, गुण-२४४), कु. पारस दिलीप सातपुते (२१ वा , गुण -२४२), कु. किशोरी ज्ञानदेव मोहिते (२३ वी, गुण-२३८), कु. साहिल अशोक गिते (२७ वा, गुण-२३०), कु. शर्वरी सुखदेव वाव्हळ (२९ वी, गुण-२२६), कु. प्रणय विठ्ठल पताले (३० , गुण-२२४) या सर्व विद्यार्थ्यांना सौ. स्वाती शेंडे, सौ. सुलभा, सौ. चारुशिला वंडेकर व सौ. प्रज्ञा मोने यांनी मार्गदर्शन केले.

* मराठा मंदिर महाराष्ट्र ज्ञानपीठातर्फे घेण्यात आलेल्या परीक्षेचा निकाल पुढील प्रमाणे-
१) गणित - इयत्ता ३ री - मराठी माध्यम १००%, इंग्रजी माध्यम १००%
२) गणित - इयत्ता ४ थी - सेमी इंग्रजी व मराठी माध्यम ९६%, ३) इंग्रजी - इयत्ता ३ री - १००%, ४) इंग्रजी - इयत्ता ४ थी - ९९.३६%, महाराष्ट्र प्रज्ञा शोध परीक्षा - निकाल ९०%
१) इ. २ री मधून कु. अंकित चंद्रकांत कोठावदे याने १०० पैकी ९० गुण मिळवून राज्यात ९३ वा येण्याचा मान पटकवला. २) इ. ३ री मधून कु. निहार दीपक पाटील याने ३०० पैकी २३४ गुण मिळवून राज्यात १६१ वा व जिल्ह्यात ३४ वा येण्याचा मान पटकवला. या विद्यार्थ्यांना सौ. ज्योती पाटील, सौ. प्रमिला राठोड, सौ. नेहा कुलकर्णी व श्रीमती संध्या प्रभाळकर या शिक्षकांनी मार्गदर्शन केले.

* दि. ९/३/१५ रोजी महिला दिनानिमित्त बालक मंदिर शाळा, कल्याण येथील शिक्षिका सौ. माळी मॅडम यांचे 'आपण स्वत:ला जरासे बदलूया' या विषयावर व्याख्यान आयोजित केले होते.

* दि. २१/६/१५ रोजी शाळेत आंतरराष्ट्रीय 'योगदिन' साजरा करण्यात आला. यामध्ये शिक्षक व विद्यार्थ्यांनी विविध योगासने सादर केली. तसेच या योगासनांचे महत्त्व सांगण्यात आले.

* दि. २७/ ६/१५ रोजी इ. १ ली ते ४ थी च्या वर्गाची पालकसभा घेण्यात आली.

* दि. २५/७/१५ रोजी आषाढी एकादशी निमित्त इ. १ ली च्या विद्यार्थ्यांची 'दिंडी' कासारहाट मधील श्री विठ्ठल मंदिरात काढण्यात आली. या उपक्रमातून विद्यार्थ्यांमधे 'सर्व धर्म समभाव' ही संकल्पना रुजवण्यात आली.

* १ ऑगस्ट रोजी लोकमान्य बाळ गंगाधर टिळक जयंती निमित्त प्रत्येक वर्गातून बालसभेचे आयोजन करण्यात आले. तसेच इयत्ता निहाय विविध स्पर्धा घेण्यात आल्या.

* सोमवार दि. १०/८/१५ ते १३/८/१५ या कालावधीत प्रथम घटक चाचणी घेण्यात आली. तसेच ऑक्टोबर महिन्यात मराठी व गणित या विषयांची शैक्षणिक प्रगती चाचणी (पायाभूत चाचणी) तोंडी व लेखी स्वरुपात घेण्यात आली.

* ५ सप्टेंबर निमित्त शिक्षक दिन साजरा करुन शिक्षकांच्या बौद्धिक स्पर्धा घेण्यात आल्या. ५ मिनिटात जास्तीत जास्त वाक्प्रचार लिहिणे. या स्पर्धेत शाळेतील शिक्षकांना खालीलप्रमाणे बक्षिसे मिळाली.
प्रथम - कु. स्मितल बनसोडे, द्वितीय - प्रियंका मराठे, तृतीय - सौ. प्रेरणा लोखंडे, उत्तेजनार्थ - सौ. ज्योती पवार व श्रीमती. संध्या प्रभाळकर.

* दि. १६/ ९/१५ ते २२/९/१५ गणेशोत्सवानिमित्त शाळेला सुट्टी देण्यात आली.

* कै. गो. ना. अक्षीकर यांची जयंती दि. २५ सप्टेंबर २०१५ रोजी साजरी करण्यात आली. तसेच जन्मदिनाचे औचित्य साधून पारितोषिक समारंभ आयोजित करून इ. ४ थी शिष्यवृत्ती परीक्षा उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा सत्कार व नेने ढाल, सुशांत वैद्य ढाल, अग्रवाल ढाल अशी पारितोषिके प्रदान करून विद्यार्थी व शिक्षकांना गौरविण्यात आले.

* मातृदिनानिमित्त माता पालकांची स्पर्धा आयोजित करण्यात आली. 'पाण्यातील काटेरी वांगी तोंडाने काढणे' ही स्पर्धा घेण्यात आली. त्यात खालील पालकांना बक्षिसे मिळाली.
प्रथम - सौ. सपना हरिश्चंद्र भंडारी, द्वितीय-सौ. शीतल लक्ष्मीकांत उकारडे, तृतीय-सौ. रुपाली रवींद्र आशेटे, उत्तेजनार्थ - सौ. अपर्णा रवींद्र सकपाळ.

* शुक्रवार दि. १/१०/१५ रोजी गांधी जयंतीनिमित्त व लालबहादूर शास्त्री जयंतीनिमित्त विद्यार्थ्यांना नेत्यांची माहिती सांगून स्वच्छता व स्वावलंबनाचे महत्त्व प्रत्येक वर्गातून सांगण्यात आले.

* दि. ९/१०/१५ रोजी शिक्षक पालक संघातर्फे विद्यार्थ्यांच्या इयत्तानिहाय स्पर्धा घेण्यात आल्या.

* दि. १५/१०/१५ रोजी भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त 'वाचन प्रेरणा दिन' साजरा करण्यात आला.

* दि. ४/११/१५ रोजी बालवाडी व प्राथमिक विभागातर्फे संयुक्तरित्या 'दिवाळी पहाट' हा कार्यक्रम साजरा करण्यात आला.

* संतराममारुती पुण्यतिथीनिमित्त दरवर्षीप्रमाणे यावर्षीही इ. ४ थी च्या विद्यार्थ्यांनी अथर्वशीर्षाचे पठण केले.

* दि. १/१२/१५ ते दि. ८/१२/१५ या दरम्यान शाळेत 'स्वच्छ विद्यालय-स्वच्छ महाराष्ट्र' हा उपक्रम राबवण्यात आला. शाळेत येणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यावर चांगले संस्कार व्हावेत म्हणून विविध सण व उत्सव साजरे केले जातात. शालेय स्तरावर गुरुपोर्णिमा, दहिहंडी, भोंडला, मकारसंक्रांत तसेच राष्ट्राभिमान जागृत होण्यासाठी 'स्वातंत्र दिन, प्रजासत्ताक दिन' साजरा करतात. थोर नेत्यांची जयंती व पुण्यतिथी यांसारखे कार्यक्रम, विविध उपक्रम व स्पर्धा घेऊन साजरे केले जातात.

* सन २०१३-१४ या शैक्षणिक वर्षात 'सकाळ' पेपरामधील चित्रकला स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थ्यांना जून २०१५ मध्ये पारितोषिके देण्यात आली. त्यांची नावे पुढील प्रमाणे- १) कु. चिन्मय पंकज चौधरी (इ. १ ली) २) कु. धारिणी सुशिलकुमार पाटील (इ. ३ री) या दोन विद्यार्थ्यांना ट्रॅव्हल बॅग देण्यात आल्या.

कु. कविराज संजय चौधरी इ. १ ली, कु. जान्हवी प्रमोद साळुंके व कु. जितेश संजय सुरोसे इ. ३ री यांना उत्तेजनार्थ पारितोषिके मिळाली.

* दि. १ व २ ऑगस्ट रोजी सोलापूर येथे झालेल्या महाराष्ट्र राऊंडर्स असोशिएशन तर्फे झालेल्या ६ व्या सिनिअर राऊंड स्टेट चॅम्पियनशिपसाठी कु. अधिराज नाना ढेरे याला प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळाले.

* अथर्व ट्रस्ट डोंबिवली तर्फे घेण्यात आलेल्या स्पर्धेत पुढील विद्यार्थ्यांनी स्पर्धानिहाय पारितोषिके मिळवली. या स्पर्धेत ७९७ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

रंगभरण स्पर्धा - कला अविष्कार

कु. मयुरी कुलकर्णी (१ ली, राज्य स्तरीय कला गौरव अविष्कार व रोख पारितोषिक)

कु. दक्ष पाटील (१ ली अ), कु. स्वराज पगडे (१ ली क), कु. महेक डोभाडे (२ री अ), कु. जिज्ञासा शेट्ट्ये (२ री अ), कु. वेदांत विचारे (२ री ब), कु. चिराग गायकवाड (२ री क), कु. श्रीकृष्ण पोपलगट (३ री अ), कु. स्वरा अष्टेकर (४ थी अ), कु. हर्षदा शिंदे (४ थी अ), कु. शर्वरी राजपूत (४ थी ब), कु. गायत्री पवार (४ थी ब), कु. हार्दिक हासे (४ थी क)

हस्ताक्षर स्पर्धा - कला अविष्कार

कु. दिशा कुंभारे (३ री अ) राज्य स्तरीय कला गौरव पुरस्कार क्र ३ रा व रोख पारितोषिक.

कु. संजना धोंगडे (१ली ब), कु. प्रचिता कुंभारे (२री अ), कु. पूजा पाटील (३री ब), कु. श्रेयस कापसे (४थी अ )

चित्रकला स्पर्धा - कला अविष्कार

कु. ईश्वरी गायकवाड (२ री ब) चित्रकला स्पर्धा राज्य गुणवत्ता कला गौरव व रोख पारितोषिक.

कु. मनस्वी चव्हाण (१ ली ब), कु. वैष्णवी पाटील (३ री क), कु. समित भदाले (४ थी ब)

भेटकार्ड स्पर्धा - कला अविष्कार

कु. वेदांत सोनार ३ री क भेटकार्ड स्पर्धा कलारत्न पुरस्कार.

कु. यश गोडे १ ली / क कला अविष्कार

या स्पर्धेचे कामकाज मुख्याध्यापिका सौ. प्रज्ञा प्रमोद मोने, सौ. चारुशिला वंडेकर, सौ. शमिका खटावकर या शिक्षकांनी पाहिले. तसेच मार्गदर्शनही केले. सौ. चारुशिला वंडेकर, सौ. शमिका खटावकर यांना कलाभूषण पुरस्कार मिळाला.

* 'चिन्मय मिशन, कल्याण' तर्फे घेण्यात आलेल्या 'आंतरराष्ट्रीय चिन्मय गीता पठण स्पर्धा' २०१५ मध्ये खालील विद्यार्थ्यांनी भाग घेतला व खालील प्रमाणे पारितोषिके मिळवली.

१) कु. संजना धोंगडे - प्रथम क्रमांक - अ गट २) कु. निधीश्री रिसबूड - द्वितीय क्रमांक - ब गट

३) कु. साक्षी जोशी - तृतीय क्रमांक - ब गट ४) कु. अनुष्का गांगल - उत्तेजनार्थ - ब गट

* शनिवार दि. १२. ९. १५ रोजी मातृदिनानिमित्त स्त्री शिक्षण मंडळातर्फे चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. त्या स्पर्धेत खालील विद्यार्थ्यांना पारितोषिक मिळाली.

१) कु. निशिगंधा नवनाथ आव्हाड - प्रथम क्रमांक २) कु. शरयू अरविंद कोल्हे - तृतीय क्रमांक

* बालक मंदिर संस्था, कल्याण, प्राथमिक शाळेतर्फे राबविलेल्या आंतरशालेय रंगभरण व हस्ताक्षर स्पर्धेत खालील विद्यार्थ्यांना बक्षिसे मिळाली.

गट क्र. १ -१) कु. ईश्वरी गायकवाड (प्रथम) २) मयूर पाटील (द्वितीय) गट क्र. २ - १) कु. निखिल पाटील.

* न्यू हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालया च्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त स्पर्धा आयोजित केल्या गेल्या. त्याचा निकाल पुढीलप्रमाणे - गट क्र. १ - १) कु. चिन्मय पंकज चौधरी- प्रथम क्रमांक -इ. २ री

२) ईश्वरी भाऊसाहेब गायकवाड- द्वितीय गट क्र. २ - कु. मनिष जगदीश भोईर - द्वितीय - इ. ४ थी

❖ नवनीत चित्रकला स्पर्धेत १४ विद्यार्थ्यांना पारितोषिके मिळाली. त्यांची नावे खालील प्रमाणे -

इयत्ता पहिली- अ - कु. किमया राहुल बिचकर-प्रथम

पहिली- ब - कु. नंदिनी रामदास नलावडे - प्रथम

पहिली- क - कु. आदर्श निवास तुपे - प्रथम

दुसरी - अ - कु. दिव्या तानाजी सहाणे - प्रथम

दुसरी - ब - कु. हर्ष बबन मढवी - प्रथम

दुसरी - क - कु. प्रथम संजय ढोले - प्रथम

दुसरी - ड - कु. समिक्षा दिनेश चोरघे - प्रथम

तिसरी- अ - कु. गौरी संतोष औटी - प्रथम

तिसरी- ब - कु. संकपटी शरद आव्हाड - प्रथम

तिसरी- क - कु. सुदर्शन बाळू सांगळे - प्रथम

तिसरी- ड - हर्ष स्वप्निल बारंगळे - प्रथम

चौथी- अ - कु. प्रणाली जगदीश माळी - प्रथम

चौथी - ब - कु. यश जीवन पाटील - प्रथम

चौथी - क - कु. आदेश आनंद पाटील- प्रथम

❖ इ. ३ री अ मधील विद्यार्थी कु. निनाद हेमंत पाठक बुद्धिबळ खेळायला तालुका व जिल्हा पातळीवर जातो. या स्पर्धांमध्ये बक्षिसेही मिळवली आहेत.

❖ उन्नती चॅरिटेबल ट्रस्ट रचना कला केंद्र, ठाणे आयोजित नाट्य स्पर्धेमध्ये 'पर्यावरणाच्या नावानं चांगभल' या नाटकाला तृतीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. कु. स्मितल बनसोडे यांना उत्तम दिग्दर्शनाचे पारितोषिक मिळाले.

❖ कॅमलिन चित्रकला स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत गट क्र. १ मधून ४ चित्रे व गट क्र. २ मधून ५ चित्रे निवडण्यात आली . त्याचा निकाल खालील प्रमाणे-

गट क्र. १
१) कु. आदर्श निवास तुपे - १ ली/क
२) कु. स्वानंद सुहास सुतार- २ री/अ
३) कु. श्रवण प्रशांत कालेकर - १ ली/ब
४) कु. अश्विनी अशोक कोळेकर - २ री/ब

गट क्र. २
१) कु. वेदांत बाळाराम भोईर - ३ री/ ड
२) कु. प्रिया संतोष बोरचटे- ३ री/अ
३) कु. समृध्दी संदीप पळणीटकर - ४ थी/अ
४) कु. मयूर कैलास आव्हाड - ४ थी/ब
५) कु. जय योगेश जोशी - ३ री/क

❖ शाळेच्या वाचनालयात शिक्षक, पालक, व विद्यार्थी यांच्यासाठी सुमारे ३००० चांगल्या दर्जाची पुस्तके असून त्याचा लाभ घेतला जातो. ज्या पालकांना वाचनालयाचा लाभ घ्यायचा आहे, त्यांनी १००/- रुपये अनामत रक्कम भरून सभासद व्हावे. वाचनालयासाठी नेहमीच पालकांचा चांगला सहभाग लाभला आहे.

❖ पालक-शिक्षक संघ व शाळा व्यवस्थापन समितीतील पालक प्रतिनिधींचे शाळेच्या प्रगतीसाठी वेळोवेळी साहाय्य लाभते.

❖ पालक आपल्या पाल्याच्या वाढदिवसानिमित्त रु. ५१/- पासून रु. ५०१/- देणगी देतात. त्या देणगीतून शाळेला आवश्यक असणारे शैक्षणिक साहित्य घेतले जाते.

❖ शाळेतील प्रेमापोटी काही हितचिंतक, माजी पालक, यांनी इलेक्ट्रिक पंखे भेट दिले आहेत. शाळा त्यांची ऋणी आहे.

अशाप्रकारे विशाल वटवृक्षाला समृध्दी व यशाच्या उत्तुंग शिखराकडे वाटचाल करण्यासाठी संस्था व शिक्षक सतत प्रयत्न करीत आहेत. त्यांना यश मिळावे ही ईश्वरचरणी प्रार्थना.

**सौ. प्रज्ञा प्रमोद मोने.**
मुख्याध्यापिका
ज. ए. इ. ची प्राथमिक शाळा, सुभेदारवाडा.

संकलन :
सौ. अनिता संजय लोंढे
(सहाय्यक शिक्षिका)